नि.दि.दा क्र.१७१/२०१५
वादीतर्फे साक्षीदार क्र.१          निशाणी १३ च्या मागे

**उलटतपास शपथेवर सुरु प्रतिवादी तर्फे वकील श्री. डि.सी. चंहादे यांच्या मार्फत**

माझी जन्म तारीख ०४.०५.१९६८ आहे. वादीचे वय आता ८५ वर्ष आहे. हे म्हणणे खरे नाही की मी सज्ञान होण्यापूर्वी दावा मिळकती बाबत काय घटना घडल्या अगर व्यवहार झाले याची मला माहिती नाही. झिबलाबाई नामदेव भोयर माझे आईची आई आहे. माझी आई दुधाळा, तालकु रामटेक येथे राहत होती. आता मला निशाणी ९२ मधील अनुक्रमांक १ कडील हक्क सोडल्याचा लेख मधील मजकूर वाचून दाखविण्यात आला. त्या लेखामध्ये नमूद झिबलाबाई नामदेव भोयर याचे नमूद असलेले नाव व पत्ता बरोबर आहे. तसेच त्या लेखामध्ये नंबर २ पुर्णाबाई नत्थुजी भुसारी यांचे नमूद असलेले नाव व पत्ता बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की झिबलाबाई व पुर्णाबाई दोघींही अंगठा लावत होत्या. झिबलाबाई सन १९९० मध्ये मरण पावली. हे म्हणणे खरे नाही की झिबलाबाई व पुर्णाबाई यांनी दिनांक १०.१०.१९८० ला हक्क सोडल्याचा लेख लिहून दिला होता. निशाणी ९२ अनुक्रमांक १ मध्ये नमूद मिळकतीचे वर्णन खोटे आहे. दाव्यामध्ये परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद सर्व्हे क्र.१०२/अ व सर्व्हे क्र. १०२/ब असे केलेले मिळकतीचे वर्णन बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकती मध्ये नमूद मिळकतीचे वर्णन व निशाणी ९२ अनुक्रमांक १ कडील लेखा मधील मिळकतीचे वर्णन एकच आहे. मौजा खंडाळा येथे झिबलाबाईच्या नावाने १४. ८५ शेती असल्याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की मौजा दुधाळा येथे माझे आईच्या नावाने १४ एकर शेती होती. हे म्हणणे खरे नाही की माझे आईला मौजा दुधाळा येथे मिळकत असल्याने तिने राजीखुशीने दावा मिळाकती मधील हक्क प्रतिवादी क्र.१ व २ यांचे हक्कात सोडून दिले होते. मी मौजा खंडाळा येथील श्रीकृष्ण घनश्याम वानखेडे यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की निशाणी ९२ अनुक्रमांक १ कडील श्रीकृष्ण घनश्याम वानखेडे यांनी लिहला आहे.

मी व्ही.आर. भारद्वाज व वामन भगवानजी नागपूरे यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की व्ही.आर. भारद्वाज व वामन भगवानजी नागपूरे हे हक्क सोडल्याच्या लेखाचे साक्षीदार होते म्हणून मी त्यांना ओळखत नाही असे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझी आई पुर्णाबाई व आजी झिबलाबाई यांनी व्ही. आर. भारद्वाज व वामनजी भगवानजी नागपूरे या साक्षीदारांच्या समोर हक्क

सोडल्याचे लेख लिहून दिला आहे व अंगठे लावून दिले आहे. माझे नाव धरमराज नत्थुजी भुसारी असे आहे. मला दिनांक १५.०१.२००५ रोजी माझी आई पुर्णाबाई हिने मुख्त्यारपत्र करून दिले आहे. हे म्हणणे खरे आहे की माझी आई पुर्णाबाई हिने मुख्त्यारपत्र करून दिले त्यावेळी ती चालू फिरू शकत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की दिनांक २९.०६.२००५ रोजी मी माझी आई पुर्णाबाई हिला नोटरी श्री एस.एस. भंडारी यांचे कडे घेउन गेलो नव्हतो. माझी आई पुर्णाबाई हिने मला दिलेले दिनांक १५.०१.२००५ रोजी चे मुख्त्यारपत्र मी दिनांक २९.०६.२००५ रोजी का नोटराईझ करून घेतले याचे कारण मला सांगता येणार नाही.

नामदेव सदू हे झिबलाबाईचे पती होते. हे म्हणणे खरे आहे की सर्व्हे क्र. १०२ ही मिळकत मुळ नामदेव सदू यांची होती. हे म्हणणे खरे आहे की निशाणी १६ नुसार नामदेव सदू यांचे नाव सर्व्हे क्र.१०२ या मिळकतीला नोंदविले आहे. हे म्हणणे खरे आहे की निशाणी १७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मौजा खंडाळा सर्व्हे क्र.४७ या मिळकतीला झिबलाबाईचे नाव नोंद झाले होते. हे म्हणणे खरे आहे की मला माझी आई पुर्णा हिच्या लग्नाबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की नामदेव भोयर कधी मरण पावले याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की झिबलाबाई कधी मरण पावली याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की झिबलाबाई मरण पावल्यानंतर माझी आई पुर्णाबाई व प्रतिवादी क्र.१ व २ हे तिचे वारस होते. हे म्हणणे खरे आहे की सर्व्हे क्र.१०२/अ, १०२/ब, ४७-१, ४७-३ व ४७-४ या मिळकती मौजा खंडाळा येथील आहेत. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकती झिबलाबाई कडे कशा आल्या याबाबतचा दस्तऐवज माझे कडे नाही. हे म्हणणे खरे आहे की मी दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये नमूद घर मिळकती संदर्भात त्या घरा महसूल किंवा ग्राम पंचायत व वार्ड क्रमांक नमूद केला नाही, तसेच त्या घराचे क्षेत्रफळ सुध्दा नमूद केले नाही. हे म्हणणे खरे आहे की मी घर मिळकतीचे सविस्तर वर्णन दाव्या मध्ये नमूद केल्या नाहीत. तसेच चर्तुरसिमा सुध्दा नमूद केल्या नाहीत.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष,

**स्वाक्षरी/-**

(अमित अ. कुलकर्णी)

दिवाणी न्यायाधीश क.स्तर

कामठी

कामठी

दिनांक : १८/०२/२०२३